ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 26 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 7

Total No. of Questions : 26 ] [ Total No. of Printed Pages : 7

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 110-M (NS)**

**Code No. : 110-M (NS)**

# ಕಲಿಕೆಯನ್ನು ಅನುಕೂಲಿಸುವುದು (ಕಿ.ಪ್ರಾ.ಶಾ.)
# ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ

# FACILITATING LEARNING ( LPS )
# FIRST LANGUAGE — MARATHI

**(ಹೊಸ ಪಠ್ಯವಸ್ತು)**

**( New Syllabus )**

ದಿನಾಂಕ : 07. 06. 2017 ]

Date : 07. 06. 2017 ]

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 10.00 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1.00 ರವರೆಗೆ ] [ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 60

Time : 10.00 A.M. to 1.00 P.M. ] [ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*

*Register Number of the Candidate*

***सामान्य सूचना :*** i) प्रत्येक उत्तराचे चिंतन करून, संघटन करून लिहीण्यास अनुकुल द्यावे म्हणुन या पेपरला 3 तास वेळ दिला आहे.

ii) प्रत्येक प्रश्नासाठी ज्या सूचना दिल्या आहेत त्या सूचना प्रमाणे उत्तरे लिहा.

**भाग - I**

I. खालील प्रश्नाना चार बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्यातील योग्य असे एक उत्तर निवडून लिहा. प्रत्येक प्रश्नाला एक गुण दिलेला आहे. प्रत्येक प्रश्न सक्तिचा आहे. ( प्रत्येक प्रश्नाला 1 गुण ) : $10 \times 1 = 10$

1. असमानता असलेल्या आजच्या समाजात शिक्षणाच्या माध्यमातुन प्रत्येक समाजाला आपापसात जोडले पाहीजेत ही व्याख्या करणारी संस्था

(अ) युनिसेफ

(आ) यु० एन० ओ०

(इ) यु० एन० डी० पी०

(ई) युनेस्को.

2. भाषेचे अस्तित्व असते ते या संदर्भात.

(अ) सामाजिक संदर्भात

(आ) वर्ग संदर्भात

(इ) अध्ययन संदर्भात

(ई) प्रज्ञा संदर्भात.

3. मुलाची घरी बोलण्याची संपूर्ण भाषा ही असते.

(अ) औपचारीक भाषा

(आ) मिश्र भाषा

(इ) अनौपचारीक भाषा

(ई) ग्रामिन भाषा.

4. मुले आपले समाधान, आनंद, दुःख, भुक, भय, प्रेम या प्रकारच्या गरजाबाबत आपल्या आजुबाजुच्या लोकांशी याद्वारे जणुन घेते.

(अ) रडण्याद्वारे

(आ) खेळाद्वारे

(इ) संभाषणाद्वारे

(ई) हावभावद्वारे.

5. जसेच्या तसे पाहुन लिहीणे म्हणजे

(अ) सुलेखन

(आ) अनुलेखन

(इ) श्रुतलेखन

(ई) गती लेखन.

6. श्रवणदोष असलेल्या मुलाला

(अ) व्यवस्थित वाचता येत नाही

(आ) व्यवस्थित लिहीता येत नाही

(इ) शिकविलेला भाग समजत नाही

(ई) व्यवस्थित ऐकू येत नाही.

7. मंदगतिने शिकणाऱ्या मुलाना

(अ) शब्दांच्या माध्यमातुन वर्णन करून शिकविले पाहीजेत

(आ) विविध शैक्षणिक साहित्य वापरून शिकविले पाहीजेत

(इ) शब्दावर जोर देऊन शिकविले पाहीजेत

(ई) वर्गातोल इतर मुलांच्या प्रमाणे शिकविले पाहीजेत.

8. मुलांच्या संभाषणातील दोष नाहोसे करण्यास

(अ) मुलाला अधिक श्रवण करण्याची संधी दिली पाहीजेत

(आ) मुलाला अधिक वाचन करण्याची संधी दिली पाहीजेत

(इ) मुलाला बोलण्याची अधिक संधि दिली पाहीजेत

(ई) मुलाला लिहीण्याची अधिक संधि दिली पाहीजेत.

9. ज्ञानात्मक विकास या भाषेमुळे होतो.

(अ) अंतरराष्ट्रीय भाषेमुळे

(आ) प्रादेशिक भाषेमुळे

(इ) मातृभाषेमुळे

(ई) राज्यभाषेमुळे.

10. माध्यमानी दिलेली माहीती अशी स्वीकारली पाहीजेत

(अ) जशोच्या तशी

(आ) विचार करून आम्हाला आवश्यक तितकी

(इ) समाजाला योग्य असेल तितकी

(ई) सत्य आणि विश्वास यातोल कमतरता समजुन घेऊन विवेचनाने स्वीकारली पाहीजेत.

**भाग - II**

II. खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान अर्धे पृष्ठ असावे ( प्रत्येक प्रश्नाला **2** गुण ) : 5 × 2 = 10

11. भाषा शिक्षणात साहित्याचे महत्व स्पष्ट करा.

12. वाचन कौशल्यातील अंतरसमावेशक उप-कौशल्यांची यादी करा.

13. मुलांच्या कडून लेखनाची पूर्व तयारी कशी करून घ्यावी ?

14. जेनड्रीज आणि अमर्त्य सेन यानी केलेली साक्षरतेची व्याख्या सांगा.

15. समावेशक वर्गाची गुणलक्षणे सांगा.

16. तुम्ही एक शिक्षक या नात्याने मुलांच्यामध्ये भाषेची आवड कशी निर्माण कराल ?

17. भाषा अध्ययनात स्थानिक संपन्मूल्याची भूमिका सांगा.

18. अलिकडच्या काळात मातृभाषा आणि घरची भाषा वेगवेगळ्या दिसुन येत आहेत. समर्थन करा.

## भाग - III

III. खालील प्रत्येक प्रश्नात निवड दिलेली आहे. त्यातील एका प्रश्नाचे उत्तर लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान एक पृष्ठ असावे. ( प्रत्येक प्रश्नाला **पाच** गुण ) : 8 × 5 = 40

19. अ) खेळ आणि अध्ययन यांचा जवळचा संबंध आहे. स्पष्ट करा.

**किंवा**

आ) मौखिक संभाषणात खेळाची भूमिका स्पष्ट करा.

20. अ) मुलांच्याकडुन कथा सांगुन घेण्यास शिक्षकाने कोणती तयारी करावी ?

**किंवा**

आ) तुम्ही एक शिक्षक या नात्याने वर्गात मुलाना कथा कशा प्रकारे सांगाल ? स्पष्ट करा.

21. अ) तुम्ही वर्गात मुलांच्यामध्ये वाचनाची पूर्वतयारी करून घेताना नवीन शब्दांची ओळख आणि औपचारीक पाठ वाचनाचा सराव कसा करून घ्याल ?

**किंवा**

आ) वाचनास अनकुल अशा कृतीमधोल शब्द तयार करण्याची कृती आणि मुलाना स्वतंत्रपणे प्रकटवाचन करण्याचे प्रशिक्षण कृती स्पष्ट करा.

22. अ) लेखनाचा अभ्यास झाल्यानंतर स्वतंत्र लेखन करण्याच्या पायऱ्या स्पष्ट करा.

**किंवा**

आ) तुम्ही एक शिक्षक या नात्याने कॉपी लेखनाचा सराव कसा करून घ्याल ?

23. अ) प्रारंभोची साक्षरता अनकुल करण्यास स्थानिक उपलब्ध असलेली दैनिके कशा प्रकारे वापरू शकतो ? चर्चा करा.

**किंवा**

आ) खालील काव्यपंगतींचा सारांश तुमच्या शब्दात लिहा :

जिंकु आम्ही लढाई
तंत्र आणि विज्ञान युगातील
आम्ही बालके सारी
ज्ञानाच्या पंखानी आता
घेऊ उंच भरारी.

राष्ट्राची सर्वोच्य धुरा ही
विज्ञानाच्या हाती
अभिमानाने गातो आम्ही
या देशाची महती

विविध फुले अन धर्मांनी
नटलेला भारत सारा,
पण सर्वाना मनापासूनी
एक तिरंगा प्यारा.

शिरीष हुतात्मा आदर्श आमुचा
आम्ही शुर शिपाई,
भारतभच्या अखंडतेची
जिंकु आम्ही लढाई.

24. अ) प्रारंभोच्या साक्षरतेच्या बाबत वर्गात शिक्षकाचे कर्तव्य कोणते ? स्पष्ट करा.

**किंवा**

आ) प्रारंभिच्या साक्षरतेबाबत मुलाला शाळेतील वातावरणात जमऊन घेण्याचे अंश स्पष्ट करा.

25. अ) संपन्मूल्ययुक्त अशा वर्गाची गुणलक्षणे स्पष्ट करा.

**किंवा**

आ) मुल आपल्या कुटुंबात घरी भाषेचे अध्ययन कसे करते ?

26. अ) समावेशक वर्ग कसा असावा ? तुमचे विचार मांडा.

**किंवा**

आ) समावेशक वर्गासाठी शिक्षकाने करावयाची अध्यापनाची तयारी सांगा.